महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र
७०८ सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०
संपर्क क्रमांक (०२०) २४४७ ६९३८ E mail: evaluationdept@maa.ac.in

---

# Question Bank

Standard :- 10th

Subject :- इतिहास आणि राज्यशास्त्र

**सूचना**

१. फक्त विद्यार्थ्यांना प्रश्नप्रकारांचा सराव करून देण्यासाठीच

२. सदर प्रश्नसंचातील प्रश्न बोर्डाच्या प्रश्नपत्रिकेत येतीलच असे नाही याची नोंद घ्यावी.

## प्रकरण : १ - इतिहासलेखन : पाश्चात्य परंपरा

**प्र. १. (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. आधुनिक इतिहास लेखनाचा जनक _______ यास म्हणता येईल.

अ) व्हॉल्टेअर ब) रेने देकार्त

क) लिओपोल्ड रांके ड) कार्ल मार्क्स

२. आर्किऑलॉजी ऑफ नॉलेज हा ग्रंथ _______ यांनी लिहिला.

अ) कार्ल मार्क्स ब) मायकेल फुको

क) लुसिऑ फेबर ड) व्हॉल्टेअर

३. द्वंद्ववादी विचार प्रणाली ________ याने मांडली.

अ) व्हॉल्टेअर ब) रेने देकार्त

क) जॉर्ज विल्हेम फ्रेडरिक हेगेल ड) कार्ल मार्क्स

४. विसाव्या शतकात फ्रान्समध्ये उदयास आलेल्या _________ मुळे इतिहास लेखनाला एक वेगळीच दिशा मिळाली.

अ) ॲनल्स प्रणाली ब) द्वंद्ववाद विचारसरणी

क) स्त्रीवाद ड) मार्क्सवाद

५. वर्ग संघर्षाचा इतिहास ___________ याने मांडला .

अ) कार्ल मार्क्स ब) मायकेल फुको

क) लुसिऑ फेबर ड) व्हॉल्टेअर

**ब) पुढीलपैकीचुकीचीजोडीओळखा.**


१) १. जॉर्ज विल्हेम फ्रेडरिक हेगेल - रीझनइन हिस्टरी
२.लिओपोल्ड व्हॉनरांके - द थिअरी अँडप्रॅक्टिसऑफहिस्टरी
३. हिरोडोटस - दहिस्टरीज
४.कार्लमार्क्स - डिस्कोर्सऑनदमेथड

२) १. रेनेदेकार्त - आधुनिकइतिहासाचाजनक
२.जॉर्जविल्हेमफ्रेडरिकहेगेल - द्वंद्ववादीविचारसरणी
३.मायकेलफुको - ज्ञानाचेपुरातत्व
४.कार्लमार्क्स - वर्गसंघर्षाचाइतिहास


३) १. वैज्ञानिक संशोधन – प्रायोगिक पद्धती
२. आधुनिक इतिहासलेखन – शास्त्रशुद्ध पद्धती
३. गॉटिंगेन विद्यापीठ - इतिहास विषयाला स्वतंत्र स्थान
४. ॲनल्स प्रणाली – ब्रिटीश इतिहासकार

**प्र. २.(अ) दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

**१. पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.**



**२.पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.**




**३. पुढील तक्ता  पूर्ण करा.**

| ग्रंथ | ग्रंथकार |
|---|---|
| १. हिस्टरी | ________________________ |
| २. ______________________ | रेने देकार्त |
| ३. दास कॅपिटल | ________________________ |
| ४.______________________ | मायकेल फुको |

**४. पुढील तक्ता  पूर्ण करा.**

| व्यक्ती | वैशिष्ट्ये |
|---|---|
| १. व्हॉल्टेअर | ________________________ |
| २. ______________________ | स्त्रीवादी इतिहासाची सुरुवात |
| ३. मायकेल फुको | ________________________ |
| ४.______________________ | वर्ग संघर्षाचा सिद्धांत |

**प्र. २.(ब)  टीपा लिहा.**

१. द्वंद्ववाद
२. ॲनल्स प्रणाली
३. इतिहासकार
४. रेने देकार्त

**प्र.३. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१. इतिहाससंशोधनामध्येप्रायोगिकपद्धतीआणिप्रत्यक्षनिरीक्षणयांचा अवलंबकरणेशक्यनसते.
२. स्त्रियांच्या आयुष्याची निगडित विविध पैलूंवर विचार करणारे संशोधन सुरू झाले.
३. फुको यांच्या लेखन पद्धतीला ज्ञानाचे पुरातत्त्व असे म्हटले जाते.
४. व्हॉल्टेअर यांस आधुनिक इतिहासाचाजनक असे म्हटले जाते.

**प्र.४. दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

ऐतिहासिक घटनांच्या लिखित नोंदी करण्याची परंपरेची सुरुवात मेसोपोटेमियातील सुमेर संस्कृतीमध्ये झाली, असे सद्यपरिस्थितीत म्हणता येईल. सुमेर राज्यात होऊन गेलेले राजे, यांच्यामधील संघर्षाच्या कहाण्या यांची वर्णने तत्कालीन शिलालेखामध्ये जतन केलेली आहेत. त्यातील सर्वाधिक प्राचीन शिलालेख सुमारे ४५०० वर्षांपूर्वी सुमेर मधील दोन राज्यांमध्ये झालेल्या युद्धाची नोंद करणारा असून तो सध्या फ्रान्समधील लूव्र या जगप्रसिद्ध संग्रहालयात ठेवला आहे.

१. ऐतिहासिक घटनांच्या लिखित नोंदी करण्याची परंपरा कोणत्या संस्कृतीत झाली?
२.सर्वाधिक प्राचीन शिलालेख कोणत्या संग्रहालयात आहे?
३. शिलालेख हे इतिहासाचे साधन कसे ठरते यावर तुमचे मत व्यक्त करा.

**प्र. ५. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. कार्ल मार्क्स यांचा वर्ग संघर्षाचा सिद्धांत स्पष्ट करा.
२. आधुनिक इतिहास लेखन पद्धतीची चार वैशिष्ट्ये कोणती?
३. स्त्रीवादी इतिहासलेखन म्हणजे काय?
४. लिओपॉल्ड व्हॉन रांके यांचा इतिहासविषयक दृष्टीकोन स्पष्ट करा.
५. इतिहास संशोधन पद्धतीत इतिहासाची मांडणी करण्याचे टप्पे लिहा.

## प्रकरण : २. इतिहासलेखन: भारतीयपरंपरा

**प्र. १.(अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. भारतीय पुरातत्व सर्वेक्षण खात्याचे पहिले सरसंचालक __________ हे होते.
अ) अलेक्झांडर कनिंगहॅम ब) विल्यम जोन्स
क) जॉन मार्शल ड) फ्रेडरिक मॅक्सम्युलर
२. हितोपदेश या संस्कृत ग्रंथाचा जर्मन भाषेत ___________ यांनी अनुवाद केला.
अ) जेम्स मिल ब) फ्रेडरिक मॅक्सम्युलर
क) माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन ड) जॉनमार्शल
३. कल्हण याने लिहिलेला ___________ हा काश्मीरच्या इतिहासावरील ग्रंथ आहे.
अ) हर्षचरित ब) अकबरनामा
क) राजतरंगिणी ड) हितोपदेश
४.रियासतकार यानावाने _________ यांना ओळखले जाते.
अ) दामोदर कोसंबी ब) गोविंद सखाराम सरदेसाई
क) वि. का. राजवाडे ड) ताराबाई शिंदे
५.महाराष्ट्रातील राष्ट्रवादी इतिहास लेखनात _________ यांच्यापासून प्रेरणा मिळाली.
अ) विष्णुशास्त्री चिपळूणकर ब) वि. का. राजवाडे
क) गोविंद सखाराम सरदेसाई ड) ताराबाई शिंदे

**ब) पुढीलपैकी चुकीची जोडी ओळखा.**

(१)
१. हूवेअर द शुद्राज – वंचितांचा इतिहास

२.स्त्री पुरुष तुलना - स्त्रीवादी लेखन
३.इंडियन वॉर ऑफइंडेपेंडेन्स 1857 - मार्क्सवादी इतिहास
४.ग्रँड डफ – वसाहतवादी इतिहास

(२)
१.महात्मा ज्योतिराव फुले - गुलामगिरी
२.डॉ. बाबासाहेब आंबेडकर - हूवेअर द शुद्राज
३.पंडिता रमाबाई – स्त्री पुरुष तुलना
४.गोविंद सखाराम सरदेसाई – मराठी रियासत

(३)
१. झिया उद्दिनबरनी - तारीख-इ-मुबारकशाही
२.हसन निजामी - ताजुल - मासिर
३.मिन्हाज - इ-सिराज - तबाकत - इ-नासिरी
४.तैमूर लंग - तुझुक- इ -तिमुरी


(४) १. अलेक्झांडर कनिंगहॅम – भारतातील प्राचीनस्थळांचे उत्खनन
२.माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन – मुंबईचे पहिले गव्हर्नर
३.सर विलिय मजोन्स – एशिया टिक सोसायटीची स्थापना
४.फ्रेडरिक मॅक्सम्युलर – हितोपदेशाचा फ्रेंच भाषेत अनुवाद

**प्र.२. (अ) दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

**१. पुढील तक्ता पूर्ण करा.**

| **जेम्समिल** | **दहिस्टरीऑफब्रिटीशइंडिया** |
|---|---|
| **जेम्स ग्रँटडफ** | **--------------------------------** |
| **------------------------------** | **द हिस्टरी ऑफ इंडिया** |
| **श्री. अ.डांगे** | **--------------------------------** |
| **----------------------------** | **हूवेअर द शुद्राज** |


**२. पुढील संकल्पना चित्र पूर्ण करा.**




३. पुढील तक्ता पूर्ण करा.

| स्त्रीवादी लेखिका | स्त्रीवादी लेखन |
|---|---|
| ताराबाई शिंदे | -------------------------------- |
| ------------------------------ | दहाय कास्ट हिंदू वुमन |
| मीरा कोसंबी | --------------------------------- |
| ---------------------------- | रायटिंग कास्ट रायटिंग जेंडर : रिडिंग दलित वुमेन्स टेस्टीमोनीज |

४. पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.




प्र.२. (ब) टीपा लिहा.

१. प्राच्यवादी इतिहासलेखन

२.राष्ट्रवादी इतिहासलेखन

३.वंचितांचा इतिहास
४. वसाहतवादी इतिहासलेखन

**प्र. ३. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१. प्रादेशिक इतिहासलेखनाला चालना मिळाली.
२. बखर हा ऐतिहासिक साहित्यातील एक महत्त्वाचा प्रकार आहे.
३.राजतरंगिणी हा ग्रंथ शास्त्रशुद्ध इतिहासलेखनाच्या आधुनिक संकल्पनेशी जवळचे नाते सांगतो.
४. गोविंद सखाराम सरदेसाई यांना रियासतकार म्हणून ओळखले जाते.

**प्र.४. दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

सोहगौडा ताम्रपट

हा ताम्रपट सोहगौडा (जिल्हा गोरखपुर, उत्तर प्रदेश) येथे सापडला. हा ताम्रपट मौर्य काळातील असावा, असे मानले जाते. ताम्रपटवरील कोरीव लेख ब्राह्मी लिपीत आहे. लेखाच्या सुरुवातीला जी चिन्हे आहेत त्यातील पारासहित असलेला वृक्ष तसेच पर्वत (एकावर एक असलेल्या तीन कमानी) ही चिन्हे प्राचीन आहत नाण्यांवरही आढळतात. चार खांबांवर उभे असलेले दुमजली इमारतीप्रमाणे दिसणारे चिन्ह कोठारघरांचे निदर्शक असावेत, असे अभ्यासकांचे मत आहे. या कोठार घरांमधील धान्य जपून वापरण्यात यावे असा आदेश या लेखात दिला आहे. दुष्काळजन्य परिस्थितीचे निवारण करण्यासाठी काय काळजी घ्यावी, या संदर्भातील हा आदेश असावा, असे मानले जाते.

१. सोहगौडा ताम्रपट कोणत्या राज्यात सापडला?
२. सोहगौडा ताम्रपटावर आढळणारी चिन्हे आणखी कोठे आढळतात?
३. सोहगौडा ताम्रपटाद्वारे कोणता इतिहास समजतो?

**प्र. ५. पुढीलप्रश्नांचीसविस्तरउत्तरेलिहा.**

१. मार्क्सवादी इतिहासलेखन म्हणजे काय?
२. इतिहासाचार्य वि.का.राजवाडे यांचे इतिहास लेखनातील योगदान स्पष्ट करा.
३. स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्रीवादी इतिहास लेखनाविषयी माहिती लिहा.
४. राष्ट्रवादी इतिहासलेखनाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.
५. प्राचीन भारतीय इतिहास लेखनाचा आढावा पुढील मुद्द्यांच्या आधारे घ्या.
अ)मौखिक परंपरा ब) कोरीव लेख क) लिखित साहित्य
६. बखर या ऐतिहासिक साहित्यप्रकाराविषयी सविस्तर माहिती लिहा.

## पाठ३. उपयोजित इतिहास

**प्र.१. (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. जगातील सर्वात प्राचीन संग्रहालय ______________ या शहराचे उत्खनन करताना सापडले.

अ) दिल्ली ब) हडप्पा

क)उर ड)कोलकाता

२. भारताचे राष्ट्रीय अभिलेखागार ____________ येथे आहे.

अ) नवी दिल्ली ब) कोलकाता

क)मुंबई ड)चेन्नई

३. विज्ञान आणि इतर सर्वच ज्ञानशाखांची ________________ हीजननी मानली जाते.

अ)तत्वज्ञान ब)नीतिशास्त्र

क)इतिहास ड) मानववंशशास्त्र

४. नॅशनल फिल्म आर्काइव्हची मुख्य कचेरी _________ येथे आहे.

अ)मुंबई ब) पुणे

क)नागपूर ड)औरंगाबाद

५. कालबेलिया हे ____________ राज्यातील लोकनृत्य जागतिक वारसा परंपरेत समाविष्ट आहे.

अ)महाराष्ट्र ब)पंजाब

क)राजस्थान ड)तामिळनाडू

६. पश्चिम घाट रांगांमधील कास पठार हे ____________ जिल्ह्यामध्ये आहे.

अ)सांगली ब)कोल्हापूर

क)सोलापूर ड)सातारा

**प्र.१. (ब) पुढीलपैकी चुकीची जोडी ओळखा.**

(१)

१. कुटियट्टम - केरळमधील संस्कृत नाट्य परंपरा

२. रम्मन - पश्चिम बंगाल मधील नृत्य

३. रामलीला -उत्तर भारतातील सादरीकरण

४. कालबेलिया - राजस्थानचे लोकसंगीत आणि लोकनृत्य

(२)

१. सूर्य मंदिर - कोणार्क

२. बृहदीश्वर मन्दिर - चंदिगढ

३.महाबोधी मंदिर - बोधगया

**४.** रानी- की- बाव – पाटण

(३)

१. उपयोजित इतिहास - जनांसाठी इतिहास


२. वनस्पती सृष्टी - नैसर्गिक वारसा

३. प्राचीन स्थळे - अमूर्त सांस्कृतिक वारसा


४. युनेस्को - जागतिक वारसा यादी

**प्र. २ (अ) दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**


**१. पुढील संकल्पना चित्र पूर्ण करा.**




२. पुढील संकल्पना चित्र पूर्ण करा.




३. पुढील संकल्पना चित्र पूर्ण करा.




**प्र. २ (ब) टीपा लिहा.**

१. उपयोजित इतिहास

२. अभिलेखागार

३. इंडियन म्युझियम : कोलकत्ता

४. नॅशनल फिल्म आर्काइव्ह

५. उर संग्रहालय

**प्र. ३. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१. तंत्रज्ञानाचा इतिहास अभ्यासावा लागतो.

२. जागतिक वारशाच्या पदास पात्र ठरणारी स्थळे,परंपरा यांची यादी युनेस्कोद्वारे जाहीर केली जाते.

३. अनेक विषयांच्या संशोधनात इतिहासाची संशोधन पद्धती उपयुक्त ठरते.

४. विज्ञानाच्या इतिहासाचे ज्ञान उपयोगी पडते.

**प्र.४. दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

जनांसाठी इतिहास

इतिहासाविषयी लोकांच्या मनात अनेक गैरसमज असतात. उदा. इतिहास हा विषय फक्त इतिहासकारांसाठी आणि इतिहास विषयाचा अभ्यास अभ्यास करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी असतो, दैनंदिन जीवनात इतिहासासारख्या विषयांचा काही उपयोग नसतो, इतिहासासारखा विषय आर्थिकदृष्ट्या उत्पादक क्षेत्राशी जोडला जाऊ शकत नाही, इत्यादी.

अशा गैरसमजावर मात करत इतिहासाची नाळ लोकांच्या वर्तमानातील जीवनसरणीशी जोडणारे क्षेत्र म्हणजे 'जनांसाठी इतिहास'.

परदेशातील अनेक विद्यापीठांमध्ये जनांसाठी इतिहास या विषयातील अभ्यासक्रम शिकवले जातात. भारतात बंगळूरू येथे 'सृष्टी इन्स्टिट्यूट ऑफ आर्ट डिझाईन अँड टेक्नॉलॉजी' या संस्थेत 'सेंटर फॉर पब्लिक हिस्टरी' हा स्वतंत्र विभाग आहे. तिथे या विषयातील प्रकल्प आणि संशोधनाचे काम चालते.

**१. 'जनांसाठी इतिहास' म्हणजे काय?**

**२. भारतातील कोणत्या संस्थेत 'सेंटर फॉर पब्लिक हिस्टरी' हा स्वतंत्र विभाग आहे?**

**३. इतिहासाविषयी लोकांच्या मनात कोणते गैरसमज असतात?**

**प्र. ५. पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१. पुढील विषयाच्या संशोधनात इतिहासाची संशोधन पद्धती कशी उपयुक्त ठरेल ते स्पष्ट करा.

(अ) विज्ञान (ब) कला (क)व्यवस्थापनशास्त्र

२. उपयोजित इतिहासाचा वर्तमानकाळाशी कसा संबंध असतो?

३. इतिहासाच्या साधनांचे जतन व्हावे यासाठी किमान सहा उपाय सूचवा.

४. नैसर्गिक आणि सांस्कृतिक वारसा जतन करण्याच्या प्रकल्पातून कोणत्या गोष्टी साध्य होतात?

५.उपयोजित इतिहासाशी संबंधित व्यावसयिक क्षेत्रे सांगा व त्या क्षेत्राच्या व्यवस्थापनासाठी आवश्यक असलेल्या कौशल्याविषयी चर्चा करा.

## ५. प्रसारमाध्यमेआणिइतिहास

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. भारतातील पहिले इंग्रजी वर्तमानपत्र ___________ यांनी सुरू केले.

अ) जेम्स ऑगस्ट सहिकी ब) सरजॉन मार्शल

क) ॲलन ह्यूम ड) बाळशास्त्री जांभेकर

२. दूरदर्शन हे __________ माध्यम आहे.

अ) दृक	ब) श्राव्य

क) दृक् - श्राव्य	ड) मुद्रित

३. बाळशास्त्री जांभेकर यांनी मराठी भाषेतील ________ हे पहिले मासिक सुरू केले.

अ) दर्पण	ब) दिग्दर्शन

क) प्रगति	ड) केसरी

४. कृष्णराव भालेकर यांनी सुरू केलेले _________ हे बहुजन समाजाचे मुखपत्र होते.

अ) दीनबंधू	ब) इंदुप्रकाश

क) केसरी	ड) ज्ञानोदय

५. आकाशवाणीच्या __________ या लोकप्रिय सेवेद्वारे विविध भाषा व बोलीभाषांमध्ये कार्यक्रम सुरू झाले.

अ) विविधभारती	ब) रेडिओ मिरची

क) युवावाणी	ड) इंडियन ब्रॉडकास्टिंग

६. मराठी वर्तमानपत्रात पहिले चित्र छापण्याचा मान _________ या वृत्तपत्राकडे जातो.

अ) दीनबंधू	ब) इंदुप्रकाश

क) केसरी	ड) ज्ञानोदय

**प्र.१ (ब) पुढीलपैकी चुकीची जोडी ओळखा.**

१)

१. प्रभाकर - प्र.के. अत्रे

२. दर्पण - बाळशास्त्री जांभेकर

३. दीनबंधू - कृष्णराव भालेकर

४.केसरी - बाळ गंगाधर टिळक

२)

१. केसरी - दैनिक

२. प्रगति - साप्ताहिक

३. दिग्दर्शन - मासिक

४.भारतीय इतिहास आणि संस्कृती - अनियतकालिक

३)

१. रोम - ॲक्टा डायर्ना


२. जर्मनी – स्टर्न

३. बांगलादेश - बेंगॉल गॅझेट

४. भारत - आकाशवाणी


**प्र.२. (अ) दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

**१. इतिहास व वर्तमानपत्र यांच्याशी संबंधित पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.**




**२. कालरेषेवर दिलेल्या तारीख – वर्षानुसार दूरदर्शनचा घटनाक्रम तयार करा.**

**दूरदर्शन**




**३. पुढील तक्ता पूर्ण करा.**

| | आकाशवाणी | दूरदर्शन |
|---|---|---|
| **पार्श्वभूमी** | -------------------------------------------------- -------------------------------------------------- | -------------------------------------------------- -------------------------------------------------- |
| **कार्य** | -------------------------------------------------- -------------------------------------------------- | -------------------------------------------------- -------------------------------------------------- |

**प्र. २ (ब) टीपा लिहा.**

१. वर्तमानपत्रांचे स्वातंत्र्यसंग्रामातील कार्य

२. प्रसारमाध्यमांची आवश्यकता

३. प्रसारमाध्यमांशी संबंधित व्यावसायिक क्षेत्रे

**प्र. ३. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१. प्रसारमाध्यमांना मिळणाऱ्या माहितीचे चिकित्सक आकलन करून घ्यावे लागते.

२. वर्तमानपत्राना इतिहास विषयाची गरज भासते.

३. सर्व प्रसारमाध्यमांत दूरदर्शन अतिशय लोकप्रिय माध्यम आहे.

४. वर्तमानपत्र ही माहितीच्या आणि ज्ञानाच्या प्रचाराचे साधन झाले आहे.

५. वर्तमानपत्र हे समाजप्रबोधनाचे कार्य करणारे महत्त्वाचे माध्यम होते.

**प्र.४. दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

डिस्कवरी ऑफ इंडिया

भारताच्या प्राचीन ते अर्वाचीन इतिहासाच्या संदर्भात दूरदर्शनवरून प्रसारित झालेली भारत एक खोज ही मालिका महत्त्वाची आहे. पंडित नेहरू यांच्या 'डिस्कवरी ऑफ इंडिया' या ग्रंथावर आधारित ही मालिका होती. श्याम बेनेगल दिग्दर्शित या मालिकेने प्राचीन काळ ते अर्वाचीन काळाचा सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय इतिहास मांडला. सखोल संशोधन आणि सादरीकरण या पातळीवर ही मालिका सरस ठरली.

हडप्पा संस्कृती, वैदिक काळ, रामायण - महाभारताचा अन्वयार्थ, मौर्य कालखंड, अफगाण आणि मोगलांचे आक्रमण, मुघल कालखंड आणि मुघल बादशाह यांचे योगदान, भक्ती चळवळ, छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य, समाजसुधारणा चळवळी आणि स्वातंत्र्यसंग्राम अशा अनेक घटना या मालिकेतून मांडल्या गेल्या.

या मालिकेत नाट्य, लोककला, प्रबोधनपर माहिती असा आधार घेत नेहरूंच्या रूपातील कलावंत रोशन सेठ प्रास्ताविक व अन्वयार्थ सांगत असत. नेहरुंचा इतिहासाकडे बघण्याचा दृष्टिकोन आणि त्याचे प्रभावी सादरीकरण यामुळे ही मालिका संपूर्ण भारतभर वाखाणली गेली.

**१.** भारत एक खोज ही मालिका कोणत्या ग्रंथावर आधारित होती?
२. भारत एक खोज या मालिकेत नेहरूंची भूमिका कोणी वठवली?
३. भारत एक खोज ही मालिका संपूर्ण भारतभर का वाखाणली गेली?

**प्र. ५. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**
१. प्राचीन काळी विविध देशांमध्ये बातम्या व संदेश कसे पोहचविले जात असत ?
२. मराठी वृत्तपत्र सृष्टीतील बाळशास्त्री जांभेकर यांचे योगदान स्पष्ट करा.
३. प्रसार माध्यमांची आवश्यकता स्पष्ट करा.
४. आकाशवाणीसाठी इतिहास हा विषय महत्त्वाचा कसा असतो?
५. आकाशवाणीच्या जडणघडण कशी झाली याची सविस्तर चर्चा करा.

## <u>प्रकरण ७खेळ आणि इतिहास</u>

**प्रश्न १ (अ)दिलेल्या पर्यायपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा**

१. ऑलिंपिक स्पर्धाची परंपरा ……………. येथे सुरू झाली.

अ. ग्रीस ब. रोम क.भारत ड.चीन

२ महाराष्ट्रात तयार होणाऱ्या लाकडी बाहुलीला ………………म्हणतात.

अ.ठकी ब.कालीचंडी क. गंगावती ड.चंपावती

३. २९ ऑगस्ट हा __________ यांचा जन्मदिवस राष्ट्रीय क्रीडादिवस म्हणून पाळला जातो.

अ) खाशाबा जाधव ब) मेजर ध्यानचंद क) बाळ पंडित ड) सचिन तेंडुलकर

४. इटलीतील ___शहराच्या उत्खननात एक भारतीय हस्तिदंती बाहुली सापडली.

अ) पॉपेई ब) रोम क) सिसिली ड) लोम्बार्डी

५. उत्तर पेशवाईतील मल्लविद्यागुरु बाळंभट दादा देवधर यांनी _________ या खेळाची निर्मिती केली.

अ) खोखो ब) आट्यापाट्या क) कबड्डी ड) मल्लखांब

**(ब) पुढीलपैकी प्रत्येक गटातील चुकीची जोडी ओळखा व लिहा.**


१) १.मल्लखांब - शारीरिक कसरतीचे खेळ
२. वॉटरपोलो -पाण्यातील खेळ
३. स्केटिंग- साहसी खेळ
४.बुद्धिबळ - मैदानी खेळ

२) १. बाळंभटदादा देवधर - मल्लखांब
२. खाशाबा जाधव - फुटबॉल
३. मेजर ध्यानचंद - हॉकी
४. सचिन तेंडुलकर - क्रिकेट

३ ) १.जुम्मादादा आणि माणिकराव यांची व्यायामशाळा -वडोदरा
२.खासबाग तालीम व मोतीबाग तालीम- सोलापूर
३.हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ - अमरावती
४.श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल – बालेवाडी, पुणे

**प्रश्न २ अ) दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

१ . पुढील संकल्पना चित्र पूर्ण करा.




**ब ) थोडक्यात टिपा लिहा.**

१. खेळणी आणि उत्सव

२. खेळ व चित्रपट

**प्रश्न ३ पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१.सध्याच्या काळात खेळाचे अर्थकारण बदलले आहे.

२ खेळण्याद्वारे इतिहासावर प्रकाश पडतो.

**प्रश्न ४ दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा**

| |
|---|
| क्रिकेट सामन्यांचे मराठी भाषेतील समालोचन पुर्वी बाळ ज. पंडित करत असत. आकाशवाणीवरून हे धावते वर्णन ऐकण्यासाठी लोक जीवाचा काम करत असत. हे समालोचन करताना बाळ पंडित त्या मैदानाचा इतिहास, खेळाडूंचा इतिहास, खेळाशी संबंधित असणाऱ्या आठवणी आणि पूर्वीचे विक्रम यांची माहिती देत असत. त्यांना खेळाचे आणि खेळाच्या इतिहासाचे उत्तम ज्ञान असल्यामुळे त्यांचे समालोचन रंजक व्हायचे. |

१. क्रिकेट सामन्यांचे मराठी भाषेतील समालोचक कोण ?
२. बाळ ज.पंडित यांना कशाचे उत्तम ज्ञान होते?
३. बाळ ज.पंडित यांच्या सामालोचनाची वैशिष्ट्ये लिहा.

**प्रश्न ५ .पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१.भारतातील खेळाच्या साहित्याच्या इतिहासाविषयी माहिती लिहा.

२. खेळ आणि इतिहास यांच्यातील परस्पर संबंध स्पष्ट करा.

३.मैदानी खेळ व बैठे खेळ यांच्यातील फरक स्पष्ट करा.

## प्रकरण 8 पर्यटन आणि इतिहास


**प्रश्न १ (अ)दिलेल्या पर्यायपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा**

१ कुकने ________ विकण्याचा एजन्सी व्यवसाय सुरू केला.
अ) हस्तकौशल्याच्या वस्तू ब) खेळणी क) खाद्यवस्तू ड) पर्यटन तिकिटे
२. महाबळेश्वरजवळील भिलार हे __________ गाव म्हणून प्रसिद्ध आहे.
अ) पुस्तकांचे ब) वनस्पतींचे क) आंब्यांचे ड) किल्ल्यांचे
३. सोळाव्या शतकातील ________ _____हा नकाशा आरेखक म्हणून प्रसिद्ध आहे.
अ) बेंजामिन ट्युडेला ब) मार्कोपोलो क) गेरहार्ट मर्केटर ड) इब्न बतूता
**प्रश्न १ ब पुढीलपैकीचुकीचीजोडीओळखा व लिहा.**


१) १. माथेरान - थंड हवेचे ठिकाण
२. ताडोबा - लेणी
३. कोल्हापूर - देवस्थान
४. अजिंठा - जागतिक वारसास्थळ

२) १. दुर्गभ्रमण यात्रा - कृषी पर्यटन
२. लोणार सरोवर भेट - भौगोलिक पर्यटन
३. हिमालयीन कार रॅली - क्रीडा पर्यटन
४. फिल्म फेस्टिवल - नैमित्तिक पर्यटन

**प्र. २ अ दिलेली संकल्पनाचित्रे पूर्ण करा.**




२ . पुढील संकल्पना चित्र पूर्ण करा.




**ब ) थोडक्यात टिपा लिहा.**

१.पर्यटनाची परंपरा
२. मार्को पोलो
३.कृषी पर्यटन
४.क्रीडा पर्यटन

**प्रश्न ३ पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१.अलीकडच्या काळात परदेशात जाण्याचे प्रमाण वाढत आहे.
२ पर्यटनामुळे त्या ठिकाणच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळते.

**प्रश्न ४ दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**भारतातील पहिले आगळेवेगळे 'पुस्तकांचे गाव'**

महाबळेश्वर येथून जवळच असलेले भिलार हेनिसर्गरम्य आणि स्ट्रॉबेरीचागोडवा असलेले गाव. यापुस्तकाच्या गावामध्ये अनेकघरांत पर्यटकांसाठीच पुस्तकेआहेत. वाचन चळवळवाढावी, मराठी भाषेतीलनवे-जुने लेखक, संत साहित्य, कथा-कादंबरी, कविता, ललित, चरित्रे-आत्मचरित्रे, स्त्री साहित्य, क्रीडा, बालसाहित्य यांच्या फुललेल्या बहारदारविश्वात तुम्ही 'वाचन-आनंद' घ्यावा, यासाठीमहाराष्ट्र शासनाने हा प्रकल्प राबवला आहे.आपण पर्यटनासाठी महाबळेश्वरला गेला तरभिलार गावाला म्हणजेच पुस्तकाच्या गावालाअवश्य भेट दया.

१.भिलारची दोन नैसर्गिक वैशिष्ट्ये कोणती?
२. भिलार प्रकल्पाचे बोधवचन कोणते आहे?
३. भिलार गाव महाराष्ट्राच्या वाचन संस्कृतीमध्ये कशी भर घालते?

**प्रश्न ५ .पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. पर्यटनाला चालना देण्यासाठी काय करायला हवे?
२.पर्यटनाचे कोणतेही तीन प्रकार स्पष्ट करा.
३.पर्यटनामुळे स्थानिक पातळीवर रोजगार निर्मिती कशी होते.
४.पर्यटन क्षेत्रातील व्यावसायिक संधीविषयी चर्चा करा.

## प्रकरण 9ऐतिहासिक ठेव्यांचे जतन

**प्रश्न १ अ. दिलेल्यापर्यायांपैकीयोग्यपर्यायनिवडूनविधानेपूर्णकरा.**

१. लिओनार्दो द विंची या या जगप्रसिद्ध इटालियन चित्रकाराने रेखाटलेल्या ______ या चित्राचा समावेश लूव्र संग्रहालयात आहे.
अ) नेपोलियन ब) मोनालिसाक) हँन्स स्लोअन ड) दुसरा जॉर्ज
२. कोलकाता येथील ________ हे भारतातील पहिले संग्रहालय होय.
अ) गव्हर्नमेंट म्युझियम ब) राष्ट्रीय वस्तुसंग्रहालय क) छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय ड) भारतीय संग्रहालय
३ भारतीय संस्कृती कोशाचे दहा खंड ________ यांच्या संपादकत्वाखाली तयार करण्यात आले.
अ) महादेवशास्त्री जोशी ब) लक्ष्मणशास्त्री जोशी क) सिद्धेश्वरशास्त्री चित्राव ड) श्रीधर व्यंकटेश केतकर
४. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीतील _________ हा महत्त्वाचा कोश आहे.
अ) विश्वकोश ब) चरित्रकोश क) संस्कृतिकोश ड) राज्यव्यवहारकोश
५. तामिळनाडूतील तंजावर येथील __________ हे प्रसिद्ध ग्रंथालय आहे.
अ) सरस्वती महाल ग्रंथालय ब) नॅशनल लायब्ररी क) स्टेट सेंट्रल लायब्ररी ड) डेव्हिड ससून लायब्ररी

**प्रश्न १ ब पुढीलपैकीचुकीचीजोडीओळखा व लिहा.**


१) १. महाराज सयाजीराव विद्यापीठ - दिल्ली
२. बनारस हिंदू विद्यापीठ - वाराणसी
३. अलिगढ मुस्लीम युनिव्हर्सिटी - अलिगढ
४. शिवाजी विद्यापीठ - ग्वालियर

२) १. लूव्र संग्रहालय - फ्रान्स
२. ब्रिटिश संग्रहालय - इंग्लंड
३. नॅशनल म्युझियम ऑफ नॅचरल हिस्ट्री - जर्मनी
४. छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय - भारत


३) १. इंडियन म्युझियम - कोलकाता
२. नॅशनल म्युझियम - मुंबई
३. सालारजंग म्युझियम - हैदराबाद
४. द् कॅलिको म्युझियम ऑफ टेक्स्टाईल - अहमदाबाद

**प्र. २ अ दिलेली संकल्पनाचित्रे पूर्ण करा.**


१ . पुढील आकृतिबंध  पूर्ण करा.




२. पुढील संकल्पना चित्र पूर्ण करा.




३. कोश वांड.मयाच्या प्रकाशन वर्षांच्य



**प्रश्न – २ ब. टिपा लिहा.**

१. स्थळकोश
२ विश्वकोश
३.भारतीय संस्कृती कोश
४. संज्ञा कोश
५.सरस्वती महाल ग्रंथालय

**प्रश्न ३ पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१.अभिलेखागारे व ग्रंथालये नियतकालिके आणि इतर प्रकाशने प्रसिद्ध करतात.
२ विविध विषयांमधील कृतीसाठी प्रशिक्षणाची आवश्यकता असते.

**प्रश्न ४ दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय, मुंबई :**इसवी सन १९०४साली मुंबईतील काही प्रतिष्ठित नागरिकांनी एकत्र येऊन प्रिन्स ऑफ वेल्सच्या भारतभेटीच्या स्मरणार्थ एक वस्तूसंग्रहालय उभारण्याचा निर्णय घेतला. इसवी सन १९०५ च्या नोव्हेंबर महिन्यात या संग्रहालयाच्या इमारतीची पायाभरणी झाली आणि संग्रहालयास नाव 'प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम ऑफ वेस्टर्न इंडिया' असे निश्चित करण्यात आले.इसवी सन १९९८ मध्ये संग्रहालयाचे नाव बदलून 'छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय' असे ठेवण्यात आले. संग्रहालयाची वास्तू- गोथिक शैलीत बांधलेली आहे. तिला मुंबई शहरातील 'पहिल्या प्रतीचे सांस्कृतिक वारसा इमारत' असा दर्जा देण्यात आलेला आहे. संग्रहालयात कला, पुरातत्व आणि निसर्गाचा इतिहास अशा तीन वर्गात विभागलेल्या सुमारे पन्नास हजार पुरावस्तू संग्रहित केलेल्या आहेत.

१. 'प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियमची पायाभरणी केव्हा झाली?
२. या संग्रहालयाची वास्तू कोणत्या शैलीत बांधण्यात आलेली आहे.
३. 'छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय'ची वैशिस्टे स्पष्ट करा.

**प्र.५ – खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तरे लिहा.**

१.ग्रंथालय व्यवस्थापन का महत्वाचे आहे ?
२.अभिलेखागाराच्या व्यवस्थापनात कोणती कामे महत्वाची आहेत ?
३. लिखित साधनांच्या जतनासाठी उपयुक्त प्रशिक्षणाबद्दल सविस्तर माहिती द्या.

---

## <u>राज्यशास्त्र -प्रकरण – १ संविधानाची वाटचाल</u>

**प्रश्न ६. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

(१) महाराष्ट्रात स्थानिक शासनसंस्थांमध्ये महिलांसाठी ------------ जागा राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत.
(अ) २५%(ब) ३०%(क) ४०%(ड) ५०%
(२) पुढील कायद्याद्वारे महिलांना त्यांचे स्वातंत्र्य जपण्यास आणि स्वतःचा विकास साधण्यास अनुकूल वातावरण निर्माण केले -
(अ) माहितीचा अधिकार कायदा(ब) हुंडा प्रतिबंधक कायदा(क) अन्नसुरक्षा कायदा(ड) या पैकी नाही
(३) लोकशाहीचा गाभा म्हणजे -------------
(अ) प्रौढ मताधिकार(ब) सत्तेचे विकेंद्रीकरण(क) राखीव जागांचे धोरण(ड) न्यायालयीन निर्णय

(४) ------------------- सरकारला अधिक पारदर्शी आणि जनतेसाठी उत्तरदायी बनवते.
(अ) माहिती अधिकार कायदा(ब) हुंडा प्रतिबंधक कायदा(क) अन्नसुरक्षा कायदा(ड) POCSO कायदा

**प्रश्न ७. पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा.**


(१) भारतीय लोकशाही जगातील सर्वात मोठी लोकशाही मानली जाते.
(२) माहितीच्या अधिकारामुळे शासनाच्या कारभारातील गोपनीयता वाढते.
(३) संविधानाचे स्वरूप एखाद्या जिवंत दस्तऐवजाप्रमाणे असते.
(४) सत्तेचे विकेंद्रीकरण हा लोकशाहीचा गाभा आहे.

**प्र ८. (अ) पुढील संकल्पना स्पष्ट करा.**

(१) हक्काधारीत दृष्टिकोन
(२) माहितीचा अधिकार
(३) लोकसभेतील महिलांचे प्रतिनिधित्व
(४) अन्याय-अत्याचार प्रतिबंधक कायदा

**(ब) दिलेल्या सूचनेनुसार कृती करा**

(१)




**प्रश्न ९. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) मतदाराचे वय २१ वर्षावरून १८ वर्षे केल्यामुळे कोणते परिणाम झाले?
(२) सामाजिक न्याय प्रस्थापित करणे म्हणजे काय?
(३) न्यायालयाने दिलेल्या कोणकोणत्या निर्णयामुळे महिलांच्या सन्मान आणि प्रतिष्ठेची जपणूक झाली आहे?
(४) संविधानाच्या मूलभूत चौकटीत कोणत्या तरतुदींचा समावेश होतो?

## प्रकरण – २. निवडणूक प्रक्रिया

**प्रश्न ६. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

(१) निवडणूक आयुक्तांची नेमणूक -------------- करतात.
(अ) राष्ट्रपती(ब) प्रधानमंत्री(क) लोकसभा अध्यक्ष(ड) उपराष्ट्रपती
(२) स्वतंत्र भारतातील पहिले मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून ----------- यांची नेमणूक झाली.
(अ) डॉ. राजेंद्रप्रसाद(ब) टी. एन. शेषन(क) सुकुमार सेन(ड) नीला सत्यनारायण
(३) मतदारसंघ निर्माण करण्याचे काम निवडणूक आयोगाची ------------- समिती करते.
(अ) निवड(ब) परिसीमन(क) मतदान(ड) वेळापत्रक
(४) -------------------------- भारताचे पहिले मतदार ठरले.
(अ) श्याम शरण नेगी(ब) सुकुमार सेन(क) टी. एन. शेषन(ड) जवाहरलाल नेहरू

**प्रश्न ७. पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा.**

(१) निवडणूक आयोग निवडणुकीच्या दरम्यान आचार संहिता लागू करते.
(२) विशिष्ट प्रसंगी निवडणूक आयोग एखाद्या मतदारसंघात पुन्हा निवडणूक घेतात.
(३) एखाद्या घटक राज्यात केव्हा व किती टप्प्यात निवडणुका घ्यायच्या हे राज्य सरकार ठरवते.
(४) इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रामध्ये समाविष्ट असलेली मतदारांची पडताळणी पावती (VVPAT) मुळे निवडणुकीतील गैरव्यवहार रोखण्यासाठी मदत होते.

**प्र८. (अ) पुढील संकल्पना स्पष्ट करा.**

(१) मतदारसंघाची पुनर्रचना
(२) मतपेटी ते इव्हीएम प्रवास
(३) मध्यावधी निवडणुका
(४) पोटनिवडणूका

**(ब) दिलेल्या सूचनेनुसार कृती करा**

(१) निवडणूक आयोग (भूमिका) ← **निवडणूक प्रक्रिया** → मतदार (भूमिका)

……………………………………… ……………………………………… ………………………………………


……………………………………… ……………………………………… ………………………………………

**निवडणूक प्रक्रिया** ↓ राजकीय पक्ष व त्यांचे उमेदवार (भूमिका)

………………………………………………….

………………………………………………….

(२)ओघ तक्ता पूर्ण करा:



**प्रश्न ९. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) निवडणूक आयोगाची कार्ये स्पष्ट करा.
(२) निवडणूक आयुक्त पदाविषयी अधिक माहिती लिहा.
(३) निवडणूक आचारसंहिता म्हणजे काय ते स्पष्ट करा.
(४) मुक्त व न्याय्य निवडणूका घेण्यासमोरील आव्हाने कोणती ते लिहा.

## प्रकरण – ३. राजकीय पक्ष

**प्रश्न ६. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

(१) राजकीय सत्ता प्राप्त करण्यासाठी जेव्हा लोक एकत्र येऊन निवडणूक प्रक्रियेत सहभागी होतात, तेव्हा त्या संघटनांना ---------- म्हटले जाते.
(अ) सरकार (ब) समाज (क) राजकीय पक्ष (ड) सामाजिक संस्था
(२) नॅशनल कॉन्फरन्स हा पक्ष -------------- येथे आहे.
(अ) ओडिशा (ब) आसाम (क) बिहार (ड) जम्मू आणि काश्मीर
(३) जस्टीस पार्टी या ब्राम्हणेत्तर चळवळीचे रूपांतर --------------- या राजकीय पक्षात झाले.
(अ) आसाम गण परिषद (ब) शिवसेना (क) द्रविड मुनेत्र कळघम (ड) जम्मू आणि काश्मीर नॅशनल कॉन्फरन्स
(४) ----------------- चे मुख्य ध्येय हे सत्ता प्राप्ती असते.
(अ) सामाजिक संघटना (ब) राजकीय पक्ष (क) सांस्कृतिक संघटना (ड) विद्यार्थी संघटना

**प्रश्न ७. पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा.**

(१) राजकीय पक्ष शासन व जनता यांच्यातील दुवा म्हणून काम करतात.
(२) राजकीय पक्ष या सामाजिक संघटनाच असतात.
(३) आघाडी शासनातून अस्थिरता निर्माण होते.
(४) 'शिरोमणी अकाली दल' हा राष्ट्रीय पक्ष आहे.

**प्र८. (अ) पुढील संकल्पना स्पष्ट करा.**

(१) प्रादेशिकता
(२) राष्ट्रीय पक्ष
(३) प्रादेशिक पक्ष

**(ब) दिलेल्या सूचनेनुसार कृती करा –**

**(१) कालरेषा पूर्ण करा. (राजकीय पक्ष आणि स्थापना वर्ष):**

| | | | |
|---|---|---|---|
| १८८५ | ......... | १९८४ | .......... |
| ............... | भारतीय जनता पक्ष | ............... | तृणमूल कॉंग्रेस |

(२) तक्ता पूर्ण करा:

महाराष्ट्रातील प्रमुख प्रादेशिक पक्ष ⟹

1. ……………...
2. ……………...
3. ……………...
4. ……………...

(३)तक्ता पूर्ण करा:

देशातील प्रमुख राष्ट्रीय पक्ष ⟹

1. ……………
2. ……………...
3. ……………...
4. ……………...

**प्रश्न ९. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) राजकीय पक्षांची ठळक वैशिष्ट्ये स्पष्ट करा.
(२) भारतातील पक्षपद्धतीच्या स्वरूपात काय बदल झाला आहे?
(३) विचारसरणी आणि पक्ष कार्यक्रम यांतील फरक स्पष्ट करा.

**प्रकरण – ४. सामाजिक व राजकीय चळवळी**

**प्रश्न ६. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

(१) शेतकरी चळवळीची -------------------- ही प्रमुख मागणी आहे.

(अ) वनजमिनिवर लागवड करण्याचा अधिकार मिळावा.(ब) शेतमालाला योग्य भाव मिळावा.

(क) ग्राहकांचे संरक्षण करणे (ड) धरणे बांधावीत

(२) शेतीचे उत्पादन वाढवण्यासाठी आणि अन्नधान्याबाबत स्वयंपूर्ण होण्यासाठी ------------------ करण्यात आली.
(अ) जलक्रांती (ब) हरितक्रांती (क) औद्योगिक क्रांती (ड) धवलक्रांती
(३) -------------------- यांना ’भारताचे जलपुरुष’ या नावाने ओळखले जाते.
(अ) डॉ. राजेंद्रसिंह राणा (ब) मेधा पाटकर (क) अण्णा हजारे (ड) दिशा रवी

**प्रश्न ७. पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा.**

(१) लोकशाहीमध्ये चळवळीला फार महत्त्व असते.
(२) चळवळीला खंबीर नेतृत्वाची गरज नसते
(३) ग्राहक चळवळ अस्तित्वात आली.
(४) हरितक्रांतीने श्रीमंत शेतकरी आणि गरीब शेतकरी असे विभाजन केले.

**प्र ८. (अ) पुढील संकल्पना स्पष्ट करा.**

(१)आदिवासी चळवळ
(२) कामगार चळवळ

(३) ग्राहक चळवळ

**(ब) दिलेल्या सूचनेनुसार कृती करा**

(१) तक्ता पूर्ण करा:




**प्रश्न ९. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) पर्यावरण चळवळीचे कार्य स्पष्ट करा.
(२) भारतातील शेतकरी चळवळीचे स्वरूप स्पष्ट करा.
(३) स्वातंत्र्यपूर्व काळात स्त्री चळवळी कोणत्या सुधारणांसाठी लढत होत्या?
(४) चळवळ म्हणजे काय?

---

**विद्यार्थ्यांसाठी सूचना -**

- इतिहास विषयाचा संकेतांक (७३) आहे.
- इतिहास राज्यशास्त्राची कृतीपत्रिका ४० गुणांची असून तुम्हाला त्यासाठी २ तासांचा अवधी असेल.
- या शैक्षणिक वर्षातील गाळलेला अभ्यासक्रम म्हणजे इतिहासाचे पाठ क्र. ४ व ६ आणि राज्यशास्त्र पाठ ५ समाविष्ट नाहीत.
- प्रश्न क्र. १ ते ५ इतिहासावर तर प्र. क्र. ६ ते ९ राज्यशास्त्रावरील प्रश्न आहेत, प्रश्नपेढीतही हाच क्रम आहे.
- ही प्रश्नपेढी सरावासाठी व प्रश्नांचे स्वरूप समजण्यासाठी नमुन्यादाखल विकसित केली आहे. याबरोबरच पाठ्यपुस्तकाचे सखोल वाचन करून इतर प्रश्नांचीही तयारी करावी.
- प्रश्नपेढी वहीत सोडवण्याचा सराव करा. विशेषत: संकल्पनाचित्रे वहीत काढण्याचा सराव करा.
- प्रत्येक प्रश्नाचे अपेक्षित उत्तर याविषयी आपले शिक्षक, सहाध्यायी यांच्याशी चर्चा करा.
- येणाऱ्या परीक्षेचा कोणताही ताण न घेता सातत्याने आपला अभ्यास व सराव चालू ठेवा.
- परीक्षेसाठी तुम्हाला मन:पूर्वक शुभेच्छा!

---